# निवृत्त लोकांसाठी आरामदायी फ्लॅट्स

## 'गोल्डन रीट्रीट गोवा'चा प्रकल्प

▶ **पणजी / प्रतिनिधी**

निवृत्त झालेल्यांना एकदम आरामदायी जीवन जगण्याची सोय आता 'गोल्डन रीट्रीट गोवा' या बांधकाम कंपनीने केली आहे. गोवा वेल्हा येथे उभारण्यात येत असलेल्या या भव्य प्रकल्पात सुमारे १०० ते २०० फ्लॅटस् असतील. त्यासाठी १०.१५ एकर जमिनीत सध्या बांधकाम सुरू आहे व तूर्तास सुमारे ३० फ्लॅटस् तयार आहेत.

गोल्डन रिट्रीट प्रकल्पाचे तथा पलासियु ग्रुप या बांधकाम कंपनीचे सहसंस्थापक विनय अशीम यांनी पणजीत एका पत्रकारपरिषदेत वरील माहिती दिली. गोवा वेल्हा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प उभारला जात आहे. ज्यामध्ये संपूर्ण प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होईल त्यावेळी सुमारे २०० फ्लॅटस् तयार होतील. अनेक वर्षे विविध ठिकाणी सेवा बजावून झाल्यानंतर आता आपल्या कुटुंबासमवेत केवळ निवृत्तीचे जीवन जगणाऱ्यांसाठी हा प्रकल्प उभारला जात आहे. एकेका फ्लॅटची किंमत तशी चांगली आहे. साधारणत: ३४९०० प्रति चौ. मी. असा दर निश्चित केलेला आहे.

या संपूर्ण प्रकल्पातच उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. गोवा वेल्हा येथील नदीकिनारी हा प्रकल्प उभारला जात आहे. सिंगल बेडरूम व डबल बेडरूम या आकारातील हे फ्लॅटस् आहेत. साधारणत: ५८ वर्षावरील व्यक्तीनाच या प्रकल्पातील फ्लॅटस् खरेदी करता येतील. पलासियु ग्रुप कंपनीने यापूर्वी मुंबई, पुणे आदी अनेक ठिकाणी आपले प्रकल्प उभारलेले आहेत. गोव्यातील वातावरण चांगले आहे. उबदार आहे निवृत्त झालेल्यांसाठी ते योग्य आहे. त्यामुळे हा प्रकल्प गोव्यात उभारताना केवळ १० कि. मी.वर राजधानी तर २० कि. मी. वर विमानतळ आणि रेल्वे स्टेशन आहे.

या प्रकल्पात २४ तास हॉटेल, वैद्यकीय सुविधा, सौर उर्जेवर आधारीत यंत्रणा, सुरक्षा व्यवस्था, तसेच फार्मसी आणि आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या सुविधा मोफत दिल्या जाणार नाहीत. परंतु त्या सुविधेतून फायदा मिळविण्यासाठी प्रयत्न कंपनी करणार नसल्याचे विनय अशिम म्हणाले.

निवृत्त झाल्यानंतर आरामात जीवन घालवावे, त्यासाठी हवेशीर जागा आणि विनाकष्ट साऱ्या सुविधा दारातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कंपनीने हा प्रकल्प स्थापन केलेला आहे. अशा तऱ्हेचे प्रकल्प दिल्ली मुंबईत मोठ्या प्रमाणात चालू असून गोव्यात प्रथमच असा प्रकल्प उभारला जात आहे असे त्यांनी सांगितले. केवळ सेवा क्षेत्रातून हा प्रकल्प उभारला जात नाही. निवृत्त लोकांच्या सुविधेसाठी हा प्रकल्प उभारला जात आहे. हा प्रकल्प ३ ते ४ टप्प्यांमध्ये पूर्ण होईल.

सध्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वास आले आहे. अधिक माहितीसाठी करंदीकर यांच्याशी ९२२५९०६६६० या क्रमांकाशी संपर्क साधता येईल.

TARUN BHARAT
27th August 2009